**नां**देड शहर कसे असले पाहिजे? याबाबत प्रत्येकाच्या मनात वेगवेगळया आणि चांगल्या कल्पना असू शकतील. या सर्व कल्पना तीन घटकात मोडू शकतात. १) स्वच्छ व सुंदर शहर २) मुलभूत सुविधायुक्त शहर ३) सर्व समावेशक शहर.

या सर्व कल्पना पुर्ण होण्यासाठी आव्हाने आणि त्या दिशेने करावयाचे प्रयत्न याबाबत नांदेड वाघाळा शहर मनपाचे **आयुक्त डॉ. निपुण विनायक (भा.प्र.से.)**यांनी लिहीलेली लेखमाला आजपासून प्रसिध्द करीत आहोत. डॉ. विनायक यांनी आतापर्यंत जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगडचे जिल्हाधिकारी तसेच राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे उपसचिव म्हणून अतिशय प्रभावीपणे जबाबदारी हाताळली आहे. गेल्या वर्षभरापासून नांदेड वाघाळा शहर मनपाचे आयुक्त म्हणून ते कार्यरत आहेत. या काळात त्यांनी नांदेडमध्ये जवळून अनुभवलेल्या, पाहिलेल्या समस्या व त्यावर शोधलेले उपाय याचा वृतांत त्यांच्याच शब्दात जशास तसाः

**(या लेखात व्यक्त झालेली मते ही डॉ. निपुण विनायक यांची व्यक्तीगत आहेत.)**

(भाग : १)

# स्वच्छता- स्वप्न आणि स्वप्नपुर्ती

**भा**रतीय संस्कृती ही स्वच्छतेची संस्कृती म्हणून ओळखल्या जाते. आजही आमच्या गरीब झोपडपट्टीतील घरासमोर सकाळीच साफसफाई करुन रांगोळी काढण्याची प्रथा आहे. महाराष्ट्रात विशेषत्वाने या प्रथेचा अवलंब केला जातो. निटनेटकेपणाची काळजी घेणाऱ्या प्रत्येकाकडून आपल्या देशात एखादी चूक झाली की, विदेशातील संबंधित विषयाशी तुलना केली जाते. स्वच्छतेचा मुद्दा याला अपवाद असूच शकत नाही. आमच्या शहरातील लोक परदेशात जाऊन तेथील स्वच्छता, निटनेटकेपणा, शिस्त आणि चांगल्या व्यवस्थेचे कौतूक करुन गुणगान गातात आणि आपले शहर असे का नाही? याचा सारा दोष शहराच्या पालक संस्थेवर लोटून देतात. स्वच्छता ही आमची संस्कृती असेल तर शहर स्वच्छ ठेवण्याचे काम इतके अवघड अणि अशक्य का झाले असेल की, `येथे तुम्हास उघडयावरील संडास, गुटख्याची पाकीटे, केळीचे सालपट, प्लॉस्टीक शहरातल्या कोणत्याही कानाकोपऱ्यात दिसणार नाही,`असे भारतातील एकही शहर आज छातीठोकपणे सांगु शकत नाही. अनेक लोकांच्या मनात असे वाचल्यानंतर पहिला मुद्दा समोर केला जातो. तो म्हणजे `शहराची स्थानिक संस्था आपले काम व्यवस्थीत पार पाडत नाही !`

संस्कृती ही एका संस्थेतून बनत नाही. ती संपूर्ण समाजातील एकंदरीत व्यवहारावरुन ठरत असते. आमची संस्कृती इतकी विवश आणि कमजोर झाली आहे का, की एखाद्या संस्थेन आपले काम व्यवस्थीत केले नाही की ती मोडून जाईल? सामाजिक बदलासाठी फक्त एखादा कायदाच कारणीभूत ठरु शकतो ? याची उत्तरे शोधायची असतील, तर सर्वात आधी खालील प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. १) हे शहर कोणाचे आहे? २) हे शहर म्हणजे काय? शहरातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था की शहरातील सर्व घरे ? ३) स्वच्छतेचा बदल घडवून आणायचा असेल तर निर्धार, ध्येयवेडेपणा, कृती करण्याची तयारी (फक्त तक्रारी नको) कोणाची असावी? ४) अस्वच्छता कशी पसरते व त्यामुळे कोणाचे व कसे नुकसान होते ?

`मला नांदेड स्वच्छ करायचे आणि ते करण्यासाठी मी स्वतः काहीतरी करायला पाहिजे. पाहिजे नाही तर चला करु या!` असा प्रत्येकाच्या मनात येणारा विचार हीच स्वच्छतेच्या स्वप्नातील गुरुकिल्ली होय. आणि मित्रहो, गंमत अशी की, हा सुविचार शंभर टक्के लोकांच्या मनात रुजण्यापर्यंत थांबण्याची गरज नाही. माझ्या मते अंदाजे ३० टक्के लोकांच्या मनात हा विचार रुजला तर पुढे - पुढे या कामास गती येईल आणि सहज शक्य होईल, हे या विचाराचे एक मुख्य अंग आहे. उदा. आमचाच एखादा व्यक्ती परदेशात जातो तेव्हा तेथे तो वेळेचे बंधन पाळण्याची, इकडे - तिकडे घाण न करण्याची काळजी घेतो. परंतु आपल्या स्वतःच्या शहरात तो तसा वागत नसेल. का ? कारण तेथील सर्वत्र असलेल्या स्वच्छ वातावरणात हा माणूस इतरांपेक्षा वेगळा वागायला तयार होऊ शकत नाही. परंतु आपल्याकडे सर्वचजण जसे करतात, तसे हा सुध्दा `चलता है ` म्हणून निष्काळजीपणे घाण करत असतो. त्यामुळे मित्रहो, नांदेड शहर स्वच्छ व सुंदर व्हायचे असेल तर या स्वप्नाने प्रत्येकाच्या मनात घर केले पाहिजे. आणि कुठेही कचरा फेकताना, थुंकताना, लघुशंका करताना एकदा तरी स्वतःला विचारावे की मी माझ्या घरी असेल तर असे केले असते का? एवढेच नव्हे तर जितका वेळ मी काम करतो, त्या पूर्ण वेळेत मी तर असे करीत नाही, माझ्या समोर कोणाला असे करु देणार नाही, इथपर्यंतची जिद्द व उत्साह आमच्या मनात असली पाहिजे. अस्वच्छतेच्या पारतंत्र्यावर विजय मिळवला तर हा विजय दुसऱ्या स्वातंत्र्यासारखाच असेल. हे स्वातंत्र्य सोपे, कोणत्याही कष्ट आणि त्यागाशिवाय मिळू शकेल.

हा विचार मनात आणून आपल्या सवयीत बदल घडवणे, ही जगातील सर्वात अवघड कामे आहेत. मानसशास्त्रतज्ज्ञांचे याबद्दल काय म्हणणे असेल मला माहित नाही. परंतु आमच्या लक्षात एक गोष्ट आली आहे. भाषण आणि उपदेश यातून कोणाच्या मनावर परिणाम होत नाही. ही मानवी वृत्तीच होय. आमच्या मनाला पटणाऱ्या गोष्टीसाठी आम्ही कुठल्याही पातळीवर जातो. पण आम्हास सांगितलेल्या गोष्टीच्या नेमक्या विरुध्द दिशेने कृती करण्याची आमची इच्छा होते.

**(क्रमशः)**

---

**- डॉ. निपुण विनायक (भा.प्र.से.)**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

-----------------------------------

**(शब्दांकन : गोविंद करवा)**